डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ,अकोला

कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा

प्राचार्य

डॉ.एस.एम.जाधव

एम.एससी.पीएच.डी.(मृदा विज्ञान व कृषि रसायनशास्त्र)

दूरध्वनी क्र.(कार्या )९८५०३७३७६४

ईमेल : atsbuldana@gmail.com


जा.क्र./कृ.तं.वि.बु./ प्रक्षेत्र / २१७ /२०२४

दिनांक : २६ / ०८ / २०२४

## निविदा सूचना

विषय : सन २०२४-२०२५ मध्ये कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा येथील प्रक्षेत्रावर सोयाबीन,उडीद व मका पिकांची सोंगनी करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून कंत्राटीपद्धतीने काम करण्याकरिता दर बोलविण्याबाबत.

वरिल विषयास अनुसरून कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा या कार्यालयाचे प्रक्षेत्रावरील सोयाबीन,उडीद व मका ( मादी वाण ) १८ हेक्टर पिकाच्या सोंगणी चे काम करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून प्रती हेक्टर दर पुरविण्यात यावे.

निविदा ( कोटेशन ) मसुदा

| अ.क्र. | प्रक्षेत्रावरील करावयाची कामे. | तपशील | हेक्टरी द्यावयाचे दर(रु.) |
|---|---|---|---|
| १ | सोयाबीन सोंगणी करणे,उचलणे व सुडी ( गंजी ) लाऊन देणे. | प्रती हेक्टरी | |
| २ | उडीद सोंगणी करणे,उचलणे व सुडी ( गंजी ) लाऊन देणे. | प्रती हेक्टरी | |
| ३ | मका पिकाची कणसे खुडणे,कणसे जमा करून खळ्यावर आणणे,सोंगणी करणे,पेंढ्या बांधणे व खळ्यावर पेंढ्या जमा करणे. | प्रती हेक्टरी | |

### अटी व शर्ती.

१. निविदा पत्रक / कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.१५ वाजता या वेळेस स्वीकारल्या जातील.

२. निविदा / कोटेशन प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा यांच्या नावाने सिलबंध लीफाफ्यामध्ये पाठवावे.

३. कंत्राटदाराकडे सबंधित कामाचा वैद्य परवाना असणे आवश्यक आहे.कंत्राटदाराला परवाना व सबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. कंत्राटपद्धतीने प्रक्षेत्रावरील कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री. किंवा पुरुष मजुराचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

५. प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा येथील प्रक्षेत्रावर सोयाबीन,उडीद.व मका संबंधी कामे करीत असतांना पिकाचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई सबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

CamScanner

६. प्रक्षेत्रावरील कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना,अपघात,जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी,अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

७. सर्व कामे पूर्ण करण्यात यावे.कामाबाबद तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.विद्यापीठ प्रशासनाणे वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे सबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

८. कंत्राटदाराने देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

९. प्रक्षेत्रावरील कामे करीत असताना कोणताही वाद / विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा यांचे समक्ष मिटवला जाईल व अंतिम निर्णय प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१०. निविदा / कोटेशन मधील सबंधित कामे कंत्राट पद्धत्तीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित निविदाधारकाची राहील.करा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

११. प्रक्षेत्रावरील कामे ही एक वर्षामधील खरीप हंगामाकरिता असून कामाचे दर ११ महिन्याकरता वैद्य राहतील.

१२. प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा कार्यालयाच्या प्रक्षेत्रावरील सोयाबीन,उडीद व मका पिकाची सोंगणी चे कामे करीत असतांना यंत्राचे / वाहनाचे / नविन सुट्या भागाचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई सबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

१३. संपूर्ण निविदा स्वीकारण्याचा वा संपूर्ण निविदा नाकारण्याचा पूर्ण अधिकार कार्यालय प्रमुखास राहील.सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहे.

१४. या कार्यालयातर्फे कंत्राटदारास सोयाबीन,उडीद व मका सोंगणी,कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही सबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

१५. प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा अंतर्गत कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे **१८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षा पेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिकदृष्ट्या सक्षम असावेत.**

१६. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा अंतर्गत प्रक्षेत्रावरील कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचाऱ्याकडे सबंधित कामाची पदविका व कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१७. पुरवठा धारकाचे मजूर पूर्णतः कंत्राटी पद्धतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाशि कोणताही सबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही.मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्टता यादी कार्यालयामार्फत देण्यात येणार नाही.

१८. कामाच्या आवश्यकतेनुसार मजूर उपलब्ध करून द्यावे लागतील.

१९. मजुरांची कामाची वेळ ही आठ तास ठरवून दिल्याप्रमाणे राहील.

२०. सदर संस्था / कंपनी / ठेकेदार असमाधानकारक काम असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वक्षारीकर्त्याकडे असतील.

२१. सदर कामाबावतचे देयक सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

२२. निविदा भरणाऱ्यास निविदेसोबत कंत्राटी कामाच्या ( अंदाजे रक्कम रु. १,७०,००० /- ) एकूण रकमेच्या ५ टक्के सुरक्षा ठेव धनादेशाद्वारे निविदेसोबत द्यावी लागेल व निविदा उघडल्यानंतर ज्या निविदाधारकाचे दर कार्यालयाने स्वीकारले नाही ( दर सर्वात कमी नसल्यामुळे ) त्यांची सुरक्षा ठेव परत करण्यात येईल तसेच

CS CamScanner

ज्यांना कंत्राट मिळाले ( दर सर्वात कमी असल्यामुळे ) त्याला त्याचे कंत्राटी काम पूर्ण झाल्यावर ५ टक्के सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

२३. वरील अटी व शर्ती मध्ये परिस्थितीनुसार सूट देण्याचा किंवा निविदा / कोटेशन उशिरा प्राप्त झाल्यास ते नाकारण्याचा अधिकार प्राचार्य,कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा यांच्याकडे राहील.

२४. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु.१०० चे स्टॅम्प पेपर वर करारनामा सादर करणे सबंधित कंत्राट दारास बंधनकारक राहील.

२५. वरील अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिलानुसार दि. ०४ / ०९ /२०२४ रोजी पर्यंत ( सुट्टीचे दिवस वगळून ) कार्यालयीन वेळेत निविदा सिलबंध लिफाफा मध्ये सादर करावी.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा

CamScanner